सकाळ | eSakal.com
Published on सकाळ (http://www.esakal.com)

# युरोपात रंगली 'होरी' (शिवांगी मांडके)

- शिवांगी मांडके shivangi.ym@gmail.com
रविवार, 13 जुलै 2014 - 01:15 AM IST




भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेनं युरोपमध्ये आयोजित केलेल्या कथक नृत्याच्या दौऱ्यात तेथील प्रेक्षकांसमोर भारतीय नृत्यकला सादर करण्यात आली. "कृष्ण संकीर्तन' हे नृत्यनाट्य झुरिचमधील प्रेक्षकांना विशेष भावलं. युरोपमध्ये कथकची "होरी' चांगलीच रंगली. भारतीय संस्कृतीबद्दल पाश्चिमात्यांच्या मनातील प्रेम नृत्याच्या माध्यमातून वृद्धिंगत करता आल्याचा आनंद या दौऱ्यातील कलावंतांना झाला. दौऱ्यात सहभागी झालेल्या नृत्यांगनेचा अनुभव....

"ब्राव्हो! सुपर्ब! एक्सलंट परफॉर्मन्स' अशा शब्दांत मिळालेली दाद आणि पुढील काही मिनिटं चालू असलेला टाळ्यांचा कडकडाट अजूनही कानांत घुमतोय! ही मनापासून दिलेली दाद होती युरोपमधील प्रेक्षकांची. भारतीय संस्कृतीमधील कथकनृत्याचे विविध पैलू पाहण्याची इच्छा प्रेक्षक पुनःपुन्हा व्यक्त करीत होते... या सगळ्याचं निमित्त होतं "भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदे'नं (आयसीसीआर) आयोजित केलेला युरोपमधील कथक नृत्याचा दौरा. या दौऱ्याची सुरवात झाली स्वित्झर्लंडमधून. "ऋजुता सोमण कल्चरल ऍकॅडमी' या संस्थेची एक शाखा झुरिच इथं कार्यरत असून, त्यांच्या वार्षिक कार्यक्रमासाठी पुण्यातून संस्थेच्या संचालक श्रीमती सोमण आणि त्यांच्या दहा विद्यार्थिनी गेल्या होत्या. तिथं कथकचे वर्ग चालविणारी त्यांची ज्येष्ठ शिष्या पूनम श्यामनं या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं.



युरोप दौऱ्यात झुरिच येथे रंगलेला 'कृष्ण संकीर्तन'चा कार्यक्रम.

युरोपमध्ये जाऊन तेथील लोकांसमोर भारतीय नृत्यकला सादर करण्याचा अनुभव अनोखा होता. युरोपीय देशांमध्ये लोकसंख्या कमी, त्यामुळे सर्व प्रकारची कामं स्वतःच करावी लागतात. झुरिचमधील पहिल्या कार्यक्रमासाठी रंगमंचावरील पडदे, प्रकाश योजना, माईक जोडणं, प्रेक्षकांसाठी खुर्च्या मांडणं, तसंच कार्यक्रम

सुरू होण्यापूर्वी व झाल्यावर रंगमंच झाडून-पुसून घेणं आदी कामं करताना खूप शिकायला मिळालं, माणसांची किंमत कळली!
भारतामध्ये कथक नृत्य सादर करताना प्रेक्षकांना कलेची आणि भाषेची ओळख असल्यामुळे नृत्य निःशंक मनानं सादर करता येतं. मात्र, युरोपीय लोकांसमोर सादरीकरण हे आव्हान होतं. पुण्यामध्ये अनेकदा सादर केलेलं "कृष्ण संकीर्तन‘ हे नृत्यनाट्य झुरिचमधील प्रेक्षकांना विशेष भावलं. गोवर्धन उचलणं, कालियादमन अशाप्रसंगी प्रेक्षकांच्या टाळ्या ठरलेल्या असायच्या, "होरी,‘ ध्रुपदमधील गणेशवंदना आणि कथकमधील पारंपरिक रचनांना मनापासून दाद मिळाली. दुसरा कार्यक्रम जर्मनीमधील बर्लिन शहरातील भारतीय दूतावासामध्ये होता. येथे केलेल्या सादरीकरणाचा उद्देश पुण्यातील ज्येष्ठ कथक नृत्यांगना कै. पंडिता रोहिणी भाटे यांना आदरांजलीचा होता! रोहिणीताईंच्या काही प्रसिद्ध रचना आणि त्यांच्या कामाचं चित्रफितीच्या मदतीनं केलेल्या सादरीकरणामुळे कार्यक्रमानं वेगळीच उंची गाठली. दौऱ्यातील पुढील टप्प्यात संस्थेच्या संचालक ऋजुता आणि त्यांच्या विद्यार्थिनी पूनम श्याम, अबोली अभ्यंकर, सायली राऊत, सानिका देवधर, शिवांगी मांडके यांनी सर्बिया, ऑस्ट्रिया, मॉंटेनिग्रो, क्रोएशिया व स्पेन या देशांत कार्यक्रम सादर केले.


व्हिएन्ना येथे संयुक्त राष्ट्रसंघाच्या आवारातील कार्यक्रम.


माद्रिद येथे सादर झालेले 'फ्लेमेंकस्थान' नृत्य.

सर्बिया या देशामधील नागरिक भारतीयांबद्दल आणि भारतीय संस्कृतीबद्दल प्रचंड उत्सुकता आणि आदर बाळगणारे ! परंतु, या देशात अचानक पूरसदृश परिस्थिती उद्भवल्यामुळे चार कार्यक्रम रद्द झाले. अशा परिस्थितीत भारतीय राजदूत नविंदर चौहान यांनी आम्हाला धीर दिला आणि आमच्या मागणीनुसार सरावासाठी तेथील जुनं राजभवन खुलं करून दिलं. ही वास्तू अतिशय भव्य होती. मोठं सभागृह, उंचच्या उंच आरसे, कोरीव काम केलेल्या वस्तू वैशिष्ट्यपूर्ण होत्या. जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी, इंदिरा गांधी आदी नेत्यांचं या ठिकाणी वास्तव्य होतं, हे कळल्यावर आम्ही भारावून गेलो. इथंच आमचा रियाज सुरू झाला आणि पहिल्याच दिवशी श्रीमती चौहान यांनी पन्नास-साठ जणांसाठी दोन तासांचा छोटेखानी कार्यक्रम ठरविला. आम्ही गणेश वंदनेनं सुरवात करून कणरी, होरी व पारंपरिक रचना सादर केल्या. या कार्यक्रमासाठी राजघराण्यातील व्यक्ती, प्रतिष्ठित नृत्यरचनाकार, बॅले डान्सर्स, विविध क्षेत्रांतील कलाकारांची विशेष उपस्थिती होती. प्रत्येक सादरीकरणानंतर जोरदार टाळ्या मिळत होत्या. मागचे लोक उठून उभं राहून, उत्सुकतेनं कार्यक्रम पाहत होते. या क्षेत्रात गेली साठ वर्षं काम करणाऱ्या एका बॅले नृत्य संस्थेचे प्रमुख म्हणाले, ""मी आत्तापर्यंत युरोपातील संथ लयीतील नृत्य पाहत आलोय; पण तुमच्या नृत्यातील जोश, ऊर्जा, नादमयता आम्हा पाहणाऱ्यांनाही नृत्यासाठी प्रेरित करत होती.‘‘ अनेकांनी त्यांची भारताबद्दलची मतं, अनुभव सांगितले. तसंच संस्कृती, नृत्यशैलीविषयी अनेक प्रश्न विचारले. सर्बियातील वृत्तवाहिनीनं आमच्या मुलाखती घेतल्या. येथील "आंतरराष्ट्रीय योग केंद्रा‘ला आम्ही भेट दिली. तेथील योगाचा प्रसार पाहून आपल्या संस्कृती आणि परंपरेचा अभिमान वृद्धिंगत झाला. येथील लेस्कोवॅक व नीश या ठिकाणी कार्यक्रम झाले. इथं शाळेतील, महाविद्यालयीन मुलं-मुली भेटायला आले. आमचे दागिने आणि रंगीबेरंगी पोशाख यांचं निरीक्षण करत होते, हात लावून पाहत होते. कार्यक्रम बारकाईनं पाहणारी एक महिला म्हणाली, ""आम्हाला आत्तापर्यंत भारताबद्दल केवळ माहिती होती, दूरचित्रवाणीवर पाहायचो; पण आता भारताबद्दल कुतूहल वाटत आहे आणि खोलात जाऊन त्याचा अभ्यास करावासा वाटतोय. तुमच्या देशाच्या विविधतेबद्दल खरंच आश्चर्य वाटतं!‘‘ हे ऐकून आमच्या अंगावर रोमांच उभे राहिले.
बेलग्रेडमधील सर्वोत्तम ऑपेरा कॉन्सर्टच्या साडेआठशे ते नऊशे क्षमता असलेल्या सभागृहामध्ये आमचा कार्यक्रम होता. येथील रंगमंचही सभागृहाइतकाच भव्य होता. गुरू पंडित सुरेशजी यांची रचना आणि त्यावर ऋजुताताईंनी बसवलेली नृत्यरचना यांच्या "तालमय कोलाज‘ला मोठी दाद मिळाली. ऑस्ट्रियामध्ये भारतीय

राजदूत राजीव मिश्रा यांच्याकडे एक कार्यक्रम झाला, तर व्हिएन्नातील दूतवासामध्ये झालेल्या कार्यक्रमासाठी प्रसिद्ध नृत्यांगना शोभना नारायण यांची उपस्थिती होती. संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्हिएन्ना येथील कार्यालयासाठी केलेला कार्यक्रम प्रतिष्ठेचा ठरला. अनेक देशांतील राजदूत आणि उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसमोर भारताचं प्रतिनिधित्व करताना जबाबदारी वाटत होती. कार्यक्रमानंतर भारतीय अधिकाऱ्यांनी प्रतिक्रिया दिली, ""खूप छान! भारताचं प्रतिनिधित्व तुम्ही उत्तमप्रकारे केलं आणि देशाचा सुंदर चेहरा लोकांसमोर मांडलात, मला तुमचा अभिमान वाटतो!‘‘

यानंतर क्रोएशियामध्ये चार कार्यक्रम झाले. सुरवातीचे दोन दिवस नवीन नृत्यसंरचना असलेले "ब्लॅकस्वान‘ सादर केलं. क्रोएशियातील कार्यक्रमानंतर एका व्यक्तीनं माझ्या हातात एक पेपर आणि पेन दिलं आणि म्हणाला, ""तुम्ही माझ्या पत्नीसाठी तुमच्या भाषेत काहीही लिहून द्या.‘‘ मी कागदावर लिहिलं, ""नमस्ते! हमारे लिए यह बहुत गर्व की बात है, की भारत की नृत्यकला प्रस्तुत करने का अवसर मिला!‘‘ त्याला कळावं म्हणून तोच मजकूर इंग्रजीमध्ये लिहून दिला. प्रत्येक शब्द वाचताना त्याचे डोळे भरून येत होते. तो म्हणाला, ""माझ्या पत्नीला भारतीय संस्कृती आणि नागरिक आवडतात. मी तिला ही भेट दिल्यावर तिला खूप आनंद होईल. मी अगदी नशीबवान आहे!‘‘ परदेशी व्यक्तीला भारताबद्दल एवढं प्रेम, आपुलकी आणि आदर असू शकतो! खरंच, नवल वाटलं. या अनोख्या दौऱ्याची सांगता खूप मोठा इतिहास आणि संस्कृती असलेल्या स्पेनमध्ये झाली. हा देश "टॅप‘ आणि "फ्लेमिंगो‘ या नृत्यशैलीसाठी प्रसिद्ध आहे. या दोन्ही नृत्यशैली कथकच्या खूप जवळ जाणाऱ्या असल्यामुळं तिथं आयोजित "फ्लेमिंगो‘ कार्यशाळेचा आनंद आम्ही लुटला. आम्ही त्यांना कथकमधील काही प्रकार शिकविले आणि त्यांच्याकडून हस्तरचना शकलो.

स्पेनमधील माद्रिद इथं शेवटचं सादरीकरण केलं. सभागृहाची क्षमता 700 ते 800 प्रेक्षकांची होती. सभागृह गच्च भरलं होतं. प्रत्येक प्रस्तुतीनंतर टाळ्या पडत होत्या. कार्यक्रम संपल्यानंतर टाळ्या, शिट्ट्या, सुपर्ब, ऑसम एवढंच ऐकू येत होतं. युरोपमध्ये प्रेक्षकांची टाळ्यांची दाद रंगमंचावर पुन्हा येऊन ती स्वीकारायची असते. आम्हाला 5 ते 6 वेळा रंगमंचावर यावं लागलं! कथकच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीबद्दल पाश्चिमात्यांच्या मनातील प्रेम वृद्धिंगत करायला मिळालं, हेच या दौऱ्याचं फलित...

**काळजी आणि प्रेम**

क्रोएशियामध्ये एके ठिकाणी कार्यक्रम झाल्यावर खाली उभे असलेल्या लोकांशी आम्ही रंगमंचावर उभे राहून बोलत होतो. एक गृहस्थ उत्सुकतेनं माझ्या पायातील घुंगरू बघत होता. त्यानं "कुठल्या धातूचे?‘ अशी चौकशी केली आणि अचानक त्यानं माझा पाय उचलला. तोल गेला म्हणून मी त्याच्याकडे पाहिलं, तर तो पायाच्या तळव्यांना अक्षरशः हात लावून जखम वगैरे तर झाली नाही ना, हे पाहत होता! तो गृहस्थ काकुळतीला येऊन इंग्रजीमध्ये म्हणाला, ""नृत्य करताना तुम्ही पायात बूट का घालत नाही? तुमचे पाय नक्कीच दुखावले गेले असतील! उभे राहू नका, कृपया बसा!‘‘ आम्हाला हसू येत होतं आणि त्याच्या काळजीचं कौतुकही वाटत होतं!

फेसबुक‘वरील सप्तरंगच्या पेजला भेट देण्यासाठी इथे क्लिक करा.

18 0

© eSakal.com, all rights reserved